# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## निदेश क्र. ३/२०२१

**विद्यापीठ परीक्षेत्रात कोरोना विषाणू (कोविड–१९) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध करणे या करिता निर्गमीत शासन आदेशानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन हिवाळी परीक्षा २०२० करीता पध्दती आणि रचना इत्यादी विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०२१.**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे.(महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७);

**आणि**

**ज्याअर्थी**, वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली साठी लागू करण्यात आला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने उत्पन्न झालेल्या परीस्थितीमुळे विद्यापीठाच्या उन्हाळी २०२० परीक्षांचे संचालन व नियोजन संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वतीने गठीत समितीच्या शिफारशी उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कडून शासन पत्र क्र. संकिर्ण युएनआय/४१३१, दि. ०८ मे २०२० नुसार विद्यापीठाला प्राप्त झाल्या होत्या;

**आणि**

**ज्याअर्थी**, विद्यापीठाच्या हिवाळी २०२० परीक्षांचे संचालन व नियोजन संदर्भात महाराष्ट्र शासनाच्या वतीने गठीत समितीच्या शिफारशी उच्च शिक्षण संचालक, पुणे यांच्या कडून शासन पत्र क्र. संकिर्ण युएनआय/४१३१, दि. ०८ मे २०२० नुसार गोंडवाना विद्यापीठ स्तरावर १० सदस्यीय समिती गठित करून उन्हाळी परीक्षा बाबत मार्गदर्शक सुचना दि. १९/०५/२०२० रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या होत्या;

**आणि**

**ज्याअर्थी**, विद्यापीठाच्या हिवाळी २०२० परीक्षांचे संचालन व नियोजन संदर्भात हिवाळी २०२० च्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याबाबत निर्णय घेण्याकरीता दि. १५ डिसेंबर २०२० रोजी आयोजीत परीक्षा व मुल्यमापन मंडळाच्या सभेत बाब क्र. ६ नुसार विषय सादर करण्यात आलेला

होता. सदर विषयावर झालेल्या निर्णयानुसार हिवाळी २०२० ची परीक्षा online MCQ पध्दतीने निर्णय घेण्यात आला होता;

**आणि**

**ज्याअर्थी**, कोविड–१९ साथ रोग संदर्भाने मिशन बिगीन अगेन अंतर्गत मार्गदर्शक तत्वे बाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०२०–२१/प्रक्र. ६/विशी–३, दि. ०३ फेब्रुवारी २०२१ नुसार रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या होत्या;

**आणि**

**ज्याअर्थी,** सदर बाब परिनियमाद्वारे नियमित होणे आवश्यक होते;

**आणि**

**ज्याअर्थी**, परिनियम तयार करून मान्यता घेतल्या जाण्याची प्रक्रिया वेळ खाऊ स्वरूपाची होती;

**आणि**

**ज्याअर्थी,** उपरोक्त शासन परिपत्रक व परीक्षा व मुल्यमापन मंडळाद्वारे सुचित मार्गदर्शक सुचनांच्या आधारावर निदेश तयार करण्याची नितांत आवश्यकता होती;

**त्याअर्थी,** मी. प्रा. श्रीनिवास वरखेडी, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये **निदेश क्र. ३/२०२१** म्हणून खाली नमुद असलेले निदेश निर्गमित करीत आहे.

१. या निदेशाला '' **विद्यापीठ परीक्षेत्रात कोरोना विषाणू (कोविड–१९) या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास प्रतिबंध करणे या करिता निर्गमीत शासन आदेशानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन हिवाळी परीक्षा २०२० करीता पध्दती आणि रचना इत्यादी विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०२१** '' असे संबोधण्यात येईल.

२. हा निदेश ज्या तारखेला निर्गमित करण्यात येईल त्या तारखेपासून अमंलात येईल.

३. विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमांच्या पुर्व कोरोना प्रादुर्भाव काळातील परीक्षे विषयी वेळोवेळी निर्गमित केलेले निदेश, अध्यादेश, परिनियम, परिपत्रक व आदेश इत्यादीमधील तरतुदी हिवाळी परीक्षा २०२० वगळून आजही लागू असतील.

४. कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने उत्पन्न झालेल्या परीस्थितीमुळे कोविड–१९ साथ रोग संदर्भाने मिशन बिगीन अगेन अंतर्गत मार्गदर्शक तत्वे बाबत उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०२०–२१/प्रक्र.६/विशी–३, दि. ०३ फेब्रुवारी २०२१ नुसार रोजी प्रकाशित करण्यात आलेल्या असून त्यामधिल तरतूदी गोंडवाना विद्यापीठाला लागू असतील.

५. सत्र २०२०—२१ दरम्यान प्रवेशीत नियमीत विद्यार्थ्यांची हिवाळी — २०२० ची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल. अशा सर्व विद्यार्थ्यांना मिळणारी श्रेणी ही सदर अभ्यासक्रमाच्या विहीत परिक्षा योजनेनुसार काढण्यात येईल. जसे उदाहरणार्थ ८० टक्के गुण विद्यापीठ मुल्यमापनावर आधारीत असेल आणि २० टक्के गुण महाविद्यालय मुल्यमापनाचे गुण लक्षात घेऊन खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ठरविल्या जाईल व तशी गुणपत्रिका सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे वितरीत केल्या जाईल.




६. सदर परीक्षा Online MCQ (बहुपर्यायी प्रश्न) पध्दतीने घेतल्या जातील. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार एकुण ७५ मिनीटांचा अवधी देण्यात येईल. एकुण ५० बहुपर्यायी प्रश्न असतील व प्रत्येक प्रश्नाला १ गुण याप्रमाणे एकुण ५० गुणांचा पेपर असेल. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर चुक आढळल्यास त्याकरीता Negative Marking असणार नाही. सदर बहुपर्यायी परीक्षेतील प्राप्त गुण संबंधीत अभ्यासक्रमाच्या परिक्षा योजनेनूसार परिवर्तीत करण्यात येतील.

७. अंर्तगत मुल्यमापनाचे गुण हे विषयाचे निरंतर मुल्यमापना अंतर्गत विहीत विविध मुल्यांकन पध्दती, सत्रपूर्व परीक्षा व सत्रमध्य परीक्षा या आधारावर द्यावयाचे आहेत, त्यामुळे महाविद्यालयाने घेतलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका वा निरंतर मुल्यमापनाच्या राबविलेल्या प्रक्रियेचे दस्तावेज सिलबंद लिफाफ्यामध्ये बंद करून महाविद्यालयामध्येच सुरक्षीत जतन करून ठेवावे व विद्यापीठाने मागणी केल्यानंतर सदर दस्तावेज सादर करणे बंधनकारक राहील.

८. उपरोक्त उल्लेखीत आयोजीत करण्यात येणाऱ्या परीक्षा या विद्यापीठाच्या १०० टक्के अथवा संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असतील. तसेच परिक्षेत्राअंतर्गत ग्रामिण भागातील महाविद्यायामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑफलाईन MCQ with OMR पध्दतीने परिक्षा देण्यात येईल. मात्र या भागातील महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना आनलाईन परिक्षा देण्याची तयारी असेल असे विद्यार्थी ऑनलाईन परिक्षा देऊ शकतील. परंतू अशा विद्यार्थ्यांची यादी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी विद्यापीठाच्या परिक्षा विभागाने वेळोवेळी सुचित केल्याप्रमाणे विहीत मुदतीपूर्वी सादर करावी.

९. पदविका, पदवीपूर्व व पदव्युत्तर परीक्षेच्या सर्व सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षा परीक्षार्थींचे छोट्या तुकड्यमध्ये विभाजणी करून दिवसभरात किमान कालावधीच्या अनेक तुकड्याद्वारे वेळापत्रक करून घ्यावयाच्या आहेत. अंतर्गत व बर्हिगत परीक्षक संबंधीत महाविद्यालयाने शक्यतो आपल्याच महाविद्यालयातील प्राध्यापकांना नेमावयाचे आहे. मात्र संबंधीत महाविद्यालयात बहिर्गत पर्यवेक्षक उपलब्ध नसल्यास लगतच्या महाविद्यालयातील अथवा लगतच्या परीसरातील प्राध्यापकांची बहिर्गत परीक्षक म्हणुन महाविद्यालयाने आपल्या स्तरावरून नेमणुक करावी व दिलेले गुण ऑनलाईन पध्दतीने परीक्षा संपल्यानंतर लगेच विद्यापीठाकडे पाठवायचे आहे. जर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बोलावून मुल्यमापन करणे शक्य नसेल तर त्यांचे जर्नल्स, अंतर्गत परीक्षा व मौखीक परीक्षा ऑनलाईन घेउन या आधारावर त्याचे मुल्यमापन करावयाचे आहे. प्रत्येक महाविद्यालयाने प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक स्वतःच्या सोईनुसार व शासनाच्या कोविड – १९ संदर्भातील मार्गदर्शक सुचनेनुसार तयार करावयाचे आहे.

१०.पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व बहिश:ल विद्यार्थ्यांच्या परीक्षा विद्यापीठाच्या प्रचलीत नियमानूसार नियमित अभ्यासक्रमाच्या परिक्षे सोबतच ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येईल.

११.जे विद्यार्थी काही अपरिहार्य कारणांमुळे विहित मुदतीत परीक्षा आवेदनपत्र सादर करू शकले नाही अशा सर्व विद्यार्थ्यांना आवेदन पत्र सादर करण्यास यथायोग्य मुदतवाढ देण्यात येईल व तशा सुचना विद्यापीठाच्या www.unigug.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रकाशित करण्यात येईल.

१२.कोविड १९ च्या प्रादुर्भावामुळे व त्याअनुषंगाने उत्पन्न झालेल्या परीस्थितीमुळे विद्यापीठाच्या हिवाळी २०२० परीक्षा पध्दती आणि रचना इत्यादीविषयी सदर निदेशा अंतर्गत उल्लेखीत प्रावधान वगळता अन्य बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यास त्याबाबचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरू महोदयांना असेल व तो सर्व संबंधीतांना बंधनकारक राहील.

**(प्रा. श्रीनिवास वरखेडी)**
**कुलगुरू**

**स्थळ: गडचिरोली**
**दिनांक: ०८/०२/२०२१**